यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222
दूरध्वनी- (0253) 2231714, 2231715, 2230227, 2230459, 2232677, 2230024

---

जा.क्र.सभा व दप्तर/2015/27
दिनांक: 9 / 4 / 2015

प्रति,
**मा.प्रा.डॉ. माणिकराव साळुंखे,**
कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
गंगापूर धरणाजवळ,
**नाशिक** - 422 222

विषय: विद्वत परिषद बैठकीच्या कार्यवृत्ताबाबत

महोदय/महोदया,

दिनांक 16 मार्च 2015 रोजी झालेल्या विद्वत परिषद बैठकीचे कार्यवृत्त सोबत पाठवित आहे. सदर कार्यवृत्त ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

15/4/15
(विवेक ओक)
सहायक कुलसचिव
सभा व दप्तर कक्ष

17/4
मा. कुलगुरू

मा. कुलगुरू कार्यालय
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्रं. : 1348
दि. 17/4 /2015

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 51 |
| स्थळ | : | ‘यश इन इंटरनॅशनल’ सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| दिनांक | : | सोमवार, 16 मार्च 2015 |
| वेळ | : | सकाळी 11.30 |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची 51 वी, विद्वत परिषद बैठक, सोमवार, दिनांक 16 मार्च 2015 रोजी सकाळी 11.30 वाजता, 'यश इन इंटरनॅशनल' सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा. डॉ .सुर्या गुंजाळ, संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा — सदस्य
3. मा. डॉ. राजेंद्र वडनेरे, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा — सदस्य
4. मा. डॉ. मनोज किल्लेदार, संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा — सदस्य
5. मा. डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रभारी संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा — सदस्य
6. मा. डॉ. प्रकाश देशमुख, प्रभारी संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा — सदस्य
7. मा. श्री. माधव पळशीकर, प्रभारी संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा — सदस्य
8. मा. डॉ. सुरेश पाटील, सहयोगी प्राध्यापक, मूल्यमापन विभाग — सदस्य
9. मा. सौ. संजीवनी महाले, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा — सदस्य
10. मा. डॉ. लतिका अजबानी, सहायक प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा — सदस्य
11. मा. डॉ. मधुकर शेवाळे, उपग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्र — सदस्य
12. मा. डॉ. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग — सदस्य
13. मा. श्री. प्रतापराव गोविंदराव पवार, पुणे — सदस्य
14. मा. श्री. प्रभाकर करंदीकर, पुणे — सदस्य
15. मा. डॉ. दिपक शिकारपूर, पुणे — सदस्य
16. मा. श्री. लक्ष्मीकांत देशमुख, पुणे — सदस्य
17. मा. श्रीमती एस.व्ही.मशरुवाला, मुंबई — सदस्य
18. मा. श्री. हर्ष गुणे, नाशिक — सदस्य
19. मा. डॉ. अर्जुन घाटोळे, परीक्षा नियंत्रक, — निमंत्रित सदस्य
20. मा. डॉ. जयदिप निकम, संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा, — निमंत्रित सदस्य
21. मा. डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव — सदस्य सचिव

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

1. मा. श्री. संजय त्र्यंबक खडक्कार, अकोला — सदस्य
2. मा. डॉ. शंकरराव मगर, पुणे — सदस्य
3. मा. डॉ. नीला डबीर, मुंबई — सदस्य
4. मा. डॉ. माधवी रेड्डी, पुणे — सदस्य
5. मा. डॉ. ऋचा गुजर, सहायक प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा — सदस्य

| विषय क्र. | | तपशील |
|---|---|---|
| 51.1.0 | | स्वागत व सादरीकरण<br>कुलसचिव यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. श्री.प्रतापराव पवार, श्री.प्रभाकर करंदीकर व डॉ.दीपक शिकारपूर यांची ही पहिलीच बैठक असल्याने मा. कुलगुरु यांनी त्यांचा परिचय करुन देऊन स्वागत केले. तसेच यापुढे विद्वत परिषदेमध्ये फक्त **धोरणात्मक निर्णयच** घेतले जातील तसेच पुढील नियोजनाबाबत जास्त भर देण्यात येईल असे मा.कुलगुरु यांनी स्पष्ट केले व सादरीकरणास सुरवात केली. त्यात त्यांनी खालील बाबींचा उल्लेख केला.<br>विद्यापीठात आयोजित केलेला २१ वा दीक्षांत समारंभ, या समारंभास मा.कुलपती व |

| | | |
|---|---|---|
| | | संगणकतज्ज्ञ डॉ.विजय भटकर यांची उपस्थिती, विद्यापीठातील कृषी विज्ञान केंद्रास कुलपतींची भेट, नाशिक येथील गोखले एज्युकेशन सोसायटीने विद्यापीठास दिलेला पुरस्कार, सन 2015-16 या वर्षात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पाठ्यपुस्तकांच्या वितरणाबाबत, डीईबी युजीसी कडून विद्यापीठास सन 2014-15 साठी ३ कोटी 30 लाख ग्रँट मिळाल्याबाबत, एम.ए (मराठी, हिंदी व इंग्रजी) अध्ययन साहित्याबाबत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याशी केलेला करार, पुणे विभागीय केंद्रातर्गत कम्युनिटी कॉलेज सुरु करण्याबाबत, विद्यापीठ अनुदान आयोगास KHUSHAL सेंटर स्थापनेबाबत पाठविण्यात आलेला प्रस्ताव, विद्यापीठातील ज्या नियमित शिक्षकांनी पीएच.डी पूर्ण केली नाही त्यांना अभ्यास रजा देणे, युजीसीच्या मार्गदर्शन सूचनेनुसार जून 2015 पासून विद्यापीठातील विद्याशाखांतर्गत पीएच.डी शिक्षणक्रम सुरु करणे, केंद्रिय मूल्यमापन कार्यक्रम, प्रमाणपत्र वितरण, विद्यार्थ्यांच्या आलेल्या तक्रारींचे FACEBOOK द्वारे निवारण, KIOSK System द्वारे विद्यार्थ्यांना माहिती देणेबाबत, विद्यापीठातील पाणी बचतीबाबत राबवलेली योजना, मुनिजय ग्राम योजना, वित्त विभागासाठी नव्याने सॉफ्टवेअर तयार करण्याबाबत इ.बाबींचा उल्लेख केला. |
| 51.2.0 | 51.2.01 | 50 व्या विद्वत परिषद बैठकीचे (दि. 29 जानेवारी 2015) कार्यवृत्त मान्यतेस्तव सादर<br>(टिपणी — दिनांक 29 जानेवारी 2015 ) रोजी झालेल्या विद्वत परिषदेचे कार्यवृत्त विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. (सहपत्र ए)<br>**वि.प.ठराव: 50 व्या विद्वत परिषद बैठकीचे (दि. 29 जानेवारी 2015) कार्यवृत्तास मंजूरी देण्यात आली.** |
| | 51.2.02 | 50 व्या विद्वत परिषद बैठकीचे (दि. 29 जानेवारी 2015)) निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>(टिपणी — 50 वी, विद्वत परिषद बैठक, गुरुवार दिनांक 29 जानेवारी, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता, 'यश इन इंटरनॅशनल' सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर विषयांच्या निर्णयावरील कार्यवाही अहवाल (सहपत्र नाही) |

| विषय क्र. | | तपशील | कार्यवाही अहवाल |
|---|---|---|---|
| 50.1.0 | | स्वागत व सादरीकरण | |
| 50.2.0 | 50.2.01 | 49 व्या विद्वत परिषद बैठकीचे (दि. 8 ऑक्टोबर 2014) कार्यवृत्त मान्यतेस्तव सादर<br>(टिपणी — दि 8 .ऑक्टोबर 2014 झालेल्या विद्वत परिषदेचे कार्यवृत्त विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. (सहपत्र ए) | ठरावाची नोंद घेण्यात आली . |
| | 50.2.02 | 49 व्या विद्वत परिषद बैठकीचे दि. 8 ऑक्टोबर 2014निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल | ठरावाची नोंद घेण्यात आली . |
| 50.3.0 | | **सखोल चर्चा करण्याचे विषय** | |
| | 50.3.01 | विद्यापीठ अनुदान आयोग यांनी निर्देशित केल्याप्रमाणे Choice Based Credit System आणि Semester पध्दत राबविण्याबाबत | नोंद घेण्यात आली व या विषयासंदर्भात पुढील विद्वत परिषदेमध्ये सखोल चर्चा करण्यात यावी असे ..ठरले |
| | 50.3.02 | **सर्व पदवी शिक्षणक्रमात पर्यावरण (Environment Study) विषय राबविणेबाबत.** | वरील विषयाबाबत संबंधित विद्याशाखा संचालक यांनी 2015 - 16 पासून सर्व पदवी शिक्षणक्रमात पर्यावरण (Enviroment Study) विषय राबविणेबाबतची कार्यवाही सुरु केलेली आहे. |
| | 50.3.03 | पीएचडी शिक्षणक्रम. PET परीक्षा | परीक्षा विभागामार्फत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | शिक्षणशास्त्र विद्याशाखा | योजना आणि कोर्सवर्क आराखडा मान्यतेबाबत | पीएच डी. शिक्षणक्रम PET परीक्षेचे आयोजन एप्रिल 2015 च्या दुसऱ्या आठवड्यात करण्यात येत आहे |
| | | | 50.3.04 मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा | एम.ए शिक्षणक्रम (मराठी, हिंदी व इंग्रजी) या विषयामध्ये कार्यान्वित करण्यास मान्यता मिळणेबाबत. | सन 2015-16 पासून एम.ए मराठी, हिंदी व इंग्रजी तसेच एम.एस्सी (Maths) हे शिक्षणक्रम कार्यान्वयित करण्यात येत आहे त्यासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी विकसित केलेले अध्ययन साहित्य वापरण्यात येणार आहे. |
| | | | 50.3.05 मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा | तृतीय वर्ष बीए. उर्दू (उर्दू माध्यम) अभ्यासक्रम व लेखकांना मान्यता मिळणेबाबत | ठरावाची नोंद घेण्यात आली. |
| | | | 50.3.06 परीक्षा विभाग | विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांसाठी विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक व पारितोषिक निश्चित करण्याबाबत | वरील विषयाबाबतची कार्यवाही 30.1.2015 रोजी संपन्न झालेल्या २१ व्या दीक्षांत समारंभात करण्यात आली |
| | | | 50.3.07 वि. प बैठक. 49.4.20 | निरंतर शिक्षण विद्याशाखेवर परिनियम क्र 6 परिच्छेद जी प्रमाणे 4 विद्वत परिषदेच्या सदस्यांमधुन एका सदस्याची नियुक्ती करणे. | विद्यापीठातील प्रत्येक ८ विद्याशाखा परिषदेवर (School Council) मा . कुलगुरु यांनी विद्वत परिषदेच्या खालील सदस्यांची नियुक्ती केलेली आहे.<br>डॉ शंकरराव मगर - कृषि विज्ञान विद्याशाखा,<br>श्री. -प्रभाकर करंदीकर निरंतर शिक्षण विद्याशाखा ,<br>श्री. हर्ष गुणे- संगणक शास्त्र विद्याशाखा<br>श्री. लक्ष्मीकांत देशमुख - मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा डॉ. नीला डबीर शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>श्रीमती एस.व्ही.मशरुवाला – वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा<br>डॉ. दिपक शिकारपूर - विज्ञान व तंत्रज्ञान ,विद्याशाखा<br>डॉ. माधवी रेड्डी - आरोग्य विज्ञान विद्याशाखा |

| | | | |
|---|---|---|---|
| | 50.3.08 विद्यार्थी सेवा विभाग | राजकीय मुक्त विद्यालय शिक्षा संस्थान उत्तरप्रदेश यांच्या परीक्षांना ,लखनऊ , मान्यता देणेबाबत | ठरावाची नोंद घेण्यात आली. |
| | 50.3.09 | दूरशिक्षण पध्दतीबाबत विद्यापीठाची वाटचाल | ठरावाची नोंद घेण्यात आली. |
| | 50.3.10 | Prospective Academic Planning | ठरावाची नोंद घेण्यात आली. |
| | 50.3.11 | संचालक विद्याशाखा विभाग /– सादरीकरण – पुढील शैक्षणिक नियोजनाबाबत | ठरावाची नोंद घेण्यात आली. |
| | 50.3.12 | Certificate in e-Education व PG Diploma in e- Educaion in Digital Society सुरु करणेबाबत. | प्रमाणपत्र ई एज्युकेशन व पदव्युत्तर पदविका ई एज्युकेशन हे शिक्षणक्रम जून 2015 पासून सुरु .करण्यात येत आहेत |
| 50.4.0 | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय | निरंक |

**वि.प.ठराव: 50 व्या विद्वत परिषद बैठकीच्या (दि. 29 जानेवारी 2015) निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. विषय क्र. 50.3.07 मध्ये मा. कुलगुरु यांना विद्वत परिषदेच्या सदस्यांमधून विद्यापीठातील विविध विद्याशाखांच्या विद्याशाखा परिषदेवर सदस्य नियुक्ती करण्याचे अधिकार देण्यात आले होते त्यानुसार विद्यापीठातील ६ विद्याशाखा परिषदांवर मा.कुलगुरु यांनी केलेली सदस्यांची नियुक्ती मान्य करण्यात आली. पुढील दोन सदस्यांच्या नियुक्तीत बदल करण्यात आला. डॉ.दिपक शिकारपूर, संगणक विद्याशाखेवर व श्री.हर्ष गुणे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेवर या नियुक्त केलेल्या बदलास मंजूरी देण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| 51.3.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय करण्याचे विषय** |
| | 51.3.01 | बी.टेक (मरीन इंजिनिअरिंग) हा शिक्षणक्रम जूलै 2015 पासून बंद करणेबाबत<br>(टिपणी – उपसंचालक, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दि.15.12.2014 च्या पत्रानुसार व विद्वत परिषद बैठक क्र. 49 दि. 8 ऑक्टोबर 2014 च्या कार्यवाही अहवालानुसार बी.टेक (मरिन इंजिनिअरिंग) हा शिक्षणक्रम बंद करण्यात आला आहे. सदर विषय विद्वत परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर) (सहपत्र बी)<br>**वि.प.ठराव: बी.टेक (मरीन इंजिनिअरिंग) हा शिक्षणक्रम जूलै 2015 पासून बंद करण्यात आला आहे याविषयाची कार्योत्तर नोंद घेण्यात येऊन अनुमती प्रदान करण्यात आली.** |
| | 51.3.02 | विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या जून 2015 ते डिसेंबर 2015 वेळापत्रकास मान्यता मिळणेबाबत<br>(टिपणी – विद्यापीठातील परीक्षा विभाग 1,2 व ३ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या परीक्षांचे वेळापत्रक (जून 2015 ते डिसेंबर 2015) यांस मा.कुलगुरु यांनी मान्यता दिली आहे. सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर (सहपत्र सी)<br>**वि.प.ठराव: विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या जून 2015 ते डिसेंबर 2015 वेळापत्रकास कार्योत्तर मंजूरी देण्यात आली. याची नोंद घेण्यात येऊन अनुमती प्रदान करण्यात आली..** |
| 51.4.0 | | **सखोल चर्चा करण्याचे विषय** |
| | 51.4.01 | युजीसी मार्गदर्शक सुचनेनुसार विद्यापीठात Choice Based Credit System राबविणेबाबत<br>(टिपणी – An Ordinance to provide for addoption of Choice Based Credit System with Semester Pattern for Post Graduagte programme of YCMOU) (सहपत्र डी)<br>**वि.प.ठराव: विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार विद्यापीठाने पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी Choice Based Credit System** |

| | | |
|---|---|---|
| | | **राबविणेबाबतचे नियम (Ordinance) तयार केले आहेत सदरील प्रस्ताव मान्य करण्यात येऊन त्यास मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.02 | विद्यापीठातील सर्व शिक्षणक्रमांसाठी शुल्क रचनेत एकसारखेपणा आणणे आणि विद्यापीठ शुल्काचे, शुल्क – शिर्ष (Fee Heads) निश्चित करणेबाबत<br>(टिपणी – विद्यापीठात अनेक शिक्षणक्रम राबविले जातात त्यांचे विद्यापीठ शुल्क वेळोवेळी ठरविले जातात आणि त्यात वेळोवेळी बदल केले गेले आहेत. त्यामुळे विद्याशाखेप्रमाणे तसेच लक्षगट प्रमाणे विद्यापीठ शुल्कात बरेच वैविध्द लक्ष्यात येते. विद्यापीठ शुल्कात 222 शिक्षणक्रमात ७२ प्रकारचे विद्यापीठ शुल्क आढळून येतात. विद्यापीठ शुल्कात एकसारखेपणा आणणे आणि एकसुत्रता आणणे आवश्यक असल्याने विद्यापीठातील सर्व शिक्षणक्रमांच्या शिक्षणशुल्कांचे अभ्यास करुन शिक्षणशुल्कात एकसुत्रता आणणे आणि विद्यापीठ शुल्केचे शुल्कशिर्ष ठरवणे हे काम हाती घेण्यात आले त्याचा अहवाल सोबत जोडला आहे. सदर विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर) (सहपत्र ई)<br>**वि.प.ठराव: विद्यापीठातील सर्व शिक्षणक्रमांसाठी शुल्क रचनेत एकसारखेपणा आणणे आणि विद्यापीठ शुल्काचे, शुल्क - शिर्ष (Fee Heads) निश्चित करणे यांस मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर** |
| | 51.4.03 | मोबाईल किंवा टॅबवर वापरता येण्यासारखे शिक्षण साहित्य निर्मिती / संमंत्रण करणेबाबत<br>(टिपणी – विद्यापीठाच्या शिक्षण पध्दतीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचे धोरण विद्यापीठाने हाती घेतले आहे. विद्यापीठाने विविध शिक्षणक्रमांसाठी विकसित केलेल्या अध्ययन साहित्याचा वापर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने थेट विद्यार्थ्यामार्फत पोहोचविण्याच्या दृष्टिने सदरचे साहित्य निर्मिती प्रक्रिया मोबाईल किंवा टॅबवर उपलब्ध करुन दिल्यास अधिक परिणामकारक होईल. त्यादृष्टिने सुरवातीस प्रायोगिक तत्वावर जानेवारी - मे 2015 या पूर्वतयारी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यासाठी Pilot Research Project हाती घेतला असून हा प्रकल्प मोबाईल किंबा टॅबवर वापरुन शिक्षण साधन निर्मिती विकसित करण्याचे ठरविले आहे. यासाठी अध्ययन साहित्य निर्मितीची प्रक्रिया (Study Material) सुरु करण्यात आली आहे. सदरचा प्रयोगाचा आढावा (निष्कर्ष) घेऊन इतर शिक्षणक्रमांसाठी हा प्रयोग टप्प्याटप्प्याने राबविता येईल. सदरचा विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर)(सहपत्र नाही)<br>**वि.प.ठराव: प्रायोगिक तत्वावर विद्यापीठाने पूर्वतयारी शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य मोबाईल किंवा टॅबवर देण्याचे ठरविले आहे. अध्ययन साहित्याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करण्यात येऊन टप्प्याटप्प्याने हा प्रयोग राबविण्याबाबत मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.04 | सन 2015-16 या वर्षापासून नवीन अभ्यासकेंद्रे देण्याबाबत नव्याने तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना व नमुना यांस मान्यता देण्याबाबत<br>(टिपणी – विद्यापीठातील विविध विद्याशाखा/विभागातर्गत राबविण्यात येणारे तसेच नव्याने तयार करण्यात येणारे विविध शिक्षणक्रम यांची जून 2015-16 पासून नव्याने अभ्यासकेंद्रे देण्याबाबत मार्गदर्शक सूचना व नमुना तयार केलेला आहे. त्यास विद्वत परिषदेची मान्यता मिळणेसाठी सादर) (सहपत्र एफ)<br>**वि.प.ठराव: सन 2015-16 या वर्षापासून नवीन अभ्यासकेंद्रे देण्याबाबत नव्याने तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना व नमुना यांस मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.05 | व्यक्तिमत्व विकास व जीवन कौशल्य आधारित शिक्षणक्रम सुरु करण्याबाबत<br>(टिपणी – महाराष्ट्र शासनाचे उपसचिव यांचे जा.क्र.संकिर्ण 2012/प्र.क्र.288/12/विशी 3 दि. 31 जानेवारी 2015 च्या पत्रानुसार राज्याचे युवा धोरण – जीवन कौशल्य शिक्षणक्रमाचा समावेश करण्याबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यानुसार सध्याच्या ज्ञानाधारित औपचारिक शिक्षण व्यवस्थेत बदल करुन व्यावसायिक दृष्टिकोनाचा विकास आणि नवीन कौशल्य आत्मसात करण्याची गरज आहे. त्यादृष्टिने विद्यापीठ स्तरावरुन |

| | | |
|---|---|---|
| | | सुधारित अभ्यासक्रमामध्ये जीवनकौशल्ये व्यक्तीमत्व विकास या शिक्षणक्रमाचा अंतर्भाव करणे. सदर विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर) (सहपत्र जी)<br>**वि.प.ठराव: विद्यापीठाने पुणे विभागीय केंद्रातर्गत कम्युनिटी कॉलेजच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व जीवन कौशल्य आधारित शिक्षणक्रम सुरु करावेत यांस मंजूरी देण्यात आली. व सदरील शिक्षणक्रम कम्युनिटी कॉलेजच्या माध्यमातून लवकरच सुरु करण्यात येत आहेत. याबाबत महाराष्ट्र शासनास कळवण्यात यावे असे ठरले. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.06 | निवृत्त प्राध्यापक / निवृत्त प्रशासकिय अधिकारी / निवृत्त सैन्य पोलिस दलातील अधिकारी / निवृत्त शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ/ निवृत्त मुख्याध्यापक यांना भरारी पथक / शैक्षणिक साहित्य विकसन, समंत्रण इ. कामासाठी नेमण्याबाबत.<br>(टिपणी – विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिक्षणक्रमांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामासाठी संपर्कसत्रे, अध्ययन साहित्य निर्मिती, विविध कार्यशाळा, भरारी पथक इत्यादी) अनुभवी मार्गदर्शक प्राध्यापक तज्ज्ञांची आवश्यकता असते. महाराष्ट्रातील विविध अभ्यासकेंद्रावर सुटीच्या दिवशी संपर्कसत्राचे आयोजन करण्यात येऊन, त्या त्या विषयातील प्राध्यापक तज्ज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देण्यासाठी भरारी पथकाची नेमणूक करण्यात येते. भरारी पथकात प्रशासकीय कामाचा अनुभव असलेल्या वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक यांना विद्यापीठामार्फत पाठविण्यात येते. सदरचे काम हे अत्यंत जबाबदारीचे असून यासाठी प्रशासकीय अनुभवी तज्ज्ञांची आवश्यकता असते. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात/तालुक्यात, निवृत्त प्राध्यापकांचा/निवृत्त प्रशासकीय अधिकारी/ निवृत्त सैन्य दलातील अधिकारी/निवृत्त शैक्षणिक क्षेत्राती तज्ज्ञ/निवृत्त मुख्याध्यापक यांच्या संघटना कार्यरत आहेत. या तज्ज्ञ व्यक्तींच्या शैक्षणिक व प्रशासकीय अनुभवाचा फायदा भरारी पथक/शैक्षणिक साहित्य विकसन, समंत्रण या कामासाठी करता येईल. यासाठी दि.24.3.2015 रोजी या तज्ज्ञ व्यक्तीसमवेत मार्गदर्शनपर पहिली कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. सदरचा विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर) (सहपत्र नाही)<br>**वि.प.ठराव: निवृत्त प्राध्यापक / निवृत्त प्रशासकिय अधिकारी / निवृत्त सैन्य पोलिस दलातील अधिकारी / निवृत्त शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ / निवृत्त मुख्याध्यापक यांना भरारी पथक / शैक्षणिक साहित्य विकसन, समंत्रण इ. कामासाठी नेमण्याबाबत सविस्तर चर्चा करुन विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाबाबत समाधान व्यक्त करुन त्यांस मंजूरी देण्यात आली. व सदरील कार्यवाही एप्रिल - मे 2015 पासून परीक्षेच्यावेळी करण्यात यावी असे ठरले. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.07 | विद्यापीठातील विविध विद्याशाखा अंतर्गत नवीन शिक्षणक्रम सुरु करण्यास मान्यता मिळणेबाबत.<br>कृषी विज्ञान विद्याशाखा – M.Sc in Agricultural Extension<br>निरंतर शिक्षण विद्याशाखा – (१) P.G.Diploma in Energy Audit .<br>(2) Bachelor of Fine Art (Painting)<br>(3) Bachelor of Fine Ar (Clustering)<br>(४) Bachelor of Fine Art (Ceramic)<br>संगणक शास्त्र विद्याशाखा –<br>(1) बी.ए (क्रिएटिव्ह डिजिटल आर्टस अन्ड न्यु मिडीया)<br>(२) डिप्लोमा इन क्रिएटिव्ह डिजिटल आर्टस अन्ड न्यु मिडीया<br>(३) अंडव्हान्स डिप्लोमा इन क्रिएटिव्ह डिजिटल आर्टस अन्ड न्यु मिडीया<br>(४) बी.एस्सी कॉम्पुटर सिस्टिम अंडमिनिस्ट्रेशन<br>(५) डिप्लोमा इन कॉम्पुटर सिस्टिम अंडमिनिस्ट्रेशन<br>(६) अँडव्हान्स डिप्लोमा इन कॉम्पुटर सिस्टिम अंडमिनिस्ट्रेशन<br>(७) डिप्लोमा इन बिझिनेस प्रोसेस मँनेजमेंट<br>(८) अँडव्हान्स डिप्लोमा इन बिझिनेस प्रोसेस मँनेजमेंट<br>(९) बी.एस्सी आय टी अँप्लिकेशन डेव्हलपमेंट |

| | | |
|---|---|---|
| | | (१०) डिप्लोमा इन आय टी अँप्लिकेशन डेव्हलपमेंट<br>(११) अंडव्हान्स डिप्लोमा इन आय टी अँप्लिकेशन डेव्हलपमेंट<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा -<br>(१)Certificate programme in Office Adminstration and Temple Management<br>(2) Certificate Programme in Bussiness analytics<br>(3) Certificate Programme in Digital and Social Media Markting<br>(4) Certificate Programme in SelfHelp Group Management<br>(5) Diploma in Airline, Hospitality and Tourism Management<br>(6) BBA in Airline, Hospitality and Tourism Management<br>(7) Diploma in Operations Management<br><br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा – सामाजिक शास्त्रातील संशोधन व पदव्युत्तर प्रमाणपत्र<br>मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा – P.G Diploma in Gandhain Thought<br>आरोग्य विज्ञान विद्याशाखा –(१) एम.एस्सी (इंडस्ट्रीय ड्रग सायन्स)<br>(२) डिप्लोमा इन पंचकर्म असिस्टंट<br>(३) डिप्लोमा इन हॉस्पटल असिस्टंट<br>(४) सर्टिफिकेट इन अँक्युप्रेशर<br>(५) डिप्लोमा इन अँक्युप्रेशन<br>(६) एम.एस्सी (मेडिकल लँब टेक्नॉलॉजी)<br>(७) एम.(ऑप्टोमेट्री) (सहपत्र नाही)<br>**वि.प.ठराव: विद्यापीठातील विविध विद्याशाखा अंतर्गत नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांना मंजूरी देण्यात आली. मात्र नवीन शिक्षणक्रम सुरु करण्याअगोदर यापुढे Programme Advisiory Committee च्या निर्देशानुसार अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक आहे. यासाठी विद्यापीठाने तयार केलेले नमुना फॉर्म (नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी मान्यता, नवीन शिक्षणक्रम/अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता) भरणे आवश्यक आहे. व त्यानंतर मा.कुलगुरु यांनी याबाबतचे पुढील निर्णय घ्यावेत.**<br>**नवीन शिक्षणक्रम सुरु करण्यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे 80% अभ्यासक्रम युजीसीने सुचविल्याप्रमाणे व 20% अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार करावा. असे ठरले.**<br>**विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतर्गत V56 बी.एस्सी (सर्व अभ्यासक्रम सत्र 1 ते 6) सुरु करण्यास मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.08 | एन.सी.टी.ई. च्या पत्रानुसार शिक्षणशास्त्र निष्णात (एम.एड) शिक्षणक्रम 2015-17 या तुकडीपासून स्थगित ठेवण्याबाबत.<br>(टिपणी – प्रा.संतोष पांडा, अध्यक्ष एन.सी.टी.ई यांचे दिनांक 23 डिसेंबर 2014 च्या पत्रानुसार व एन.सी.टी.ई.च्या 2014 च्या रेग्युलेशननुसारसन 2015-17 या तुकडीपासून एम.एड शिक्षणक्रम स्थगीत ठेवण्यात येत आहे. सदर विषय विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी सादर) (सहपत्र एच)<br>**वि.प.ठराव: एन.सी.टी.ई. च्या पत्रानुसार शिक्षणशास्त्र निष्णात (एम.एड) शिक्षणक्रम 2015-17 या तुकडीपासून स्थगित ठेवण्याबाबत विद्यापीठास आलेल्या पत्राची नोंद घेण्यात येऊन मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.09 | विविध ज्ञानशाखातील विद्यार्थ्यांना विद्यापीठातून बी.ए शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यासाठी प्रवेश पात्रतेविषयी तयार करण्यात आलेले नियम यांस मान्यता मिळणेबाबत<br>(टिपणी - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात बी.ए शिक्षणक्रमासाठी विविध ज्ञानशाखातील विद्यार्थी प्रवेश घेऊ इच्छितात त्यांच्यासाठी प्रवेश पात्रतेचे नियम तयार केलेले आहेत त्यास विद्वत परिषदेची मान्यता मिळण्यासाठी सादर) (सहपत्र आय)<br>**वि.प.ठराव: विविध ज्ञानशाखातील विद्यार्थ्यांना विद्यापीठात बी.ए शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यासाठी, प्रवेश पात्रतेविषयी तयार करण्यात आलेल्या** |

| | | |
|---|---|---|
| | | **खालील नियमांना मंजूरी देण्यात आली.**<br>**1. प्रथम वर्ष – पूर्वतयारी शिक्षणक्रम पूर्ण केलेले, 12 वी उत्तीर्ण असणारे, 12 वी नंतर 2 वर्षाची शासनमान्य पदविका प्राप्त केलेले, आणि डी.एड पदविकेच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेणारे**<br>**2. द्वितीय वर्ष – अन्य विद्यापीठातील कोणत्याही शाखेत प्रथम वर्ष पूर्ण केलेले, 12 वी नंतर डी.एड पदविका पूर्ण करणारे, मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदविका उत्तीर्ण असणारे.**<br>**3. तृतीय वर्ष – अन्य विद्यापीठातून किंवा अन्य शाखातून बी.एस्सी., बी.कॉम, अभियांत्रिकी , संगणक इ. द्वितीय वर्ष पूर्ण केलेले मात्र विशेष स्तरावरील विषय निवडताना त्यांनी तो विषय द्वितीय वर्षात अभ्यासलेला असावा. जर विद्यार्थ्याला द्वितीय वर्षात न अभ्यासलेल्या विषयाची निवड करावयाची असेल तर त्याला त्या वर्षाचे द्वितीय वर्षाचे अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील.**<br>**ज्या विद्यार्थ्यांनी बी.ए शिक्षणक्रमाचे द्वितीय वर्ष अन्य विद्यापीठातून पूर्ण केले आहे आणि ज्याचे बी.ए शिक्षणक्रम पूर्ण करणे राहून गेलेल आहे अशा विद्यार्थ्यांना तृतीय वर्ष बी.ए साठी प्रवेश घेता येईल. विशेष स्तरावर जो विषय निवडावयाचा आहे. तो विषय त्यांनी द्वितीय वर्षात अभ्यासलेला असावा. नसल्यास त्याला त्या विषयाचे द्वितीय व तृतीय वर्षाचे अभ्यासक्रम त्यास पूर्ण करावे लागतील. मात्र त्याला एका वर्षात दोन्ही वर्षाची परीक्षा देता येणार नाही.**<br>**आपल्या विद्यापीठाच्या व अन्य विद्यापीठाच्या ज्या विद्यार्थ्यांना श्रेणी सुधार करावयाची आहे त्यांनाही अशी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी त्यांना द्वितीय व तृतीय वर्षाचे संबंधित विषयाचे अभ्यासक्रम पूर्ण करुन श्रेणी सुधार करता येईल. मात्र त्याला एका वर्षात दोन्ही वर्षाची परीक्षा देता येणार नाही.**<br>**ज्या विद्यार्थ्यांना आठ वर्षाचा नोंदणी कालावधी संपुष्टात आलेला आहे. त्यांना नोंदणी कालावधी वाढवून देण्यासाठी विनंती करता येईल. मात्र ही विनंती नोंदणी कालावधी संपण्यापूर्वी सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे. अर्ज केल्यानंतर सदर विद्यार्थ्यास नोंदणी कालावधी पुढील तीनच वर्षाकरिता वाढविण्यात येईल. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.10 | एम.ए (मराठी, हिंदी आणि इंग्रजी) शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबत व शिक्षणक्रमाच्या शुल्काबाबत<br>(टिपणी –जून 2015 या शैक्षणिक वर्षापासून एम.ए मराठी, हिंदी व इंग्रजी हे शिक्षणक्रम सुरु करण्यात येत असून कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधरास एम.ए शिक्षणक्रमास प्रवेश देता येईल तसेच एम.ए मराठी, हिदी व इंग्रजी या शिक्षणक्रमासाठी प्रथम वर्षासाठी रुपये 4000/- व द्वितीय वर्षासाठी रु.5500/- शुल्क रचना निश्चित करण्यात आलेली आहे. त्यास विद्वत परिषदची मान्यता मिळणेबाबत) (सहपत्र जे)<br>**वि.प.ठराव: कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधरास, एम.ए (मराठी, हिंदी आणि इंग्रजी) या शिक्षणक्रमास प्रवेश देता येईल व या शिक्षणक्रमासाठी प्रथम वर्षास रुपये 4000/- व द्वितीय वर्षास रुपये 5500/- प्रवेश शुल्क निश्चित करण्यास मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर** |
| | 51.4.11 | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात बी.ए (सर्व्हिसेस अँडमिनिस्ट्रेशन) या अभ्यासक्रमाचे स्टडी सेंटर अँट वर्कप्लेस सुरु करण्यास मान्यता मिळणेबाबत (सहपत्र के)<br>**वि.प.ठराव: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात बी.ए (सर्व्हिसेस अँडमिनिस्ट्रेशन) या अभ्यासक्रमाचे स्टडी सेंटर अँट वर्कप्लेस सुरु करण्यास व जून 2015 पासून सदरील अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षासाठी 60 विद्यार्थी घेण्यास व त्यांना प्रथम वर्षास दरमहा रुपये 7000/-, द्वितीय वर्षास रुपये 8000/- व तृतीय वर्षास रुपये 9000/- विद्यावेतन देण्यास मंजूरी देण्यात आली. बी.ए (सर्व्हिसेस** |

| | | |
|---|---|---|
| | | **अँडमिनिस्ट्रेशन) या अभ्यासक्रमाचे नाव ठरविण्याचा अधिकार मा. कुलगुरु यांना देण्यात आला. यांस मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.12 | बी.ए (सर्व्हिसेस अँडमिन्स्ट्रेशन) व एन.सी.टी.ई च्या 2014 च्या मार्गदर्शक तत्वानुसार बी.एड शिक्षणक्रमाच्या पुर्नरचनेस मान्यता मिळणेबाबत (सहपत्र एल)<br>**वि.प.ठराव: बी.ए (सर्व्हिसेस अँडमिन्स्ट्रेशन) व एन.सी.टी.ई च्या 2014 च्या मार्गदर्शक तत्वानुसार बी.एड शिक्षणक्रमाच्या पुर्नरचनेस मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.13 | V55 Diploma in Electrical Engineering, V62 Diploma in Mechanical Engineering,V63 Diploma in Electronics and Telecummination Engineering या तीन्ही शिक्षणक्रमांचे सिलँबस पुर्नरचना करण्यास मान्यता मिळणेबाबत. (सहपत्र नाही)<br>**वि.प.ठराव: V55 Diploma in Electrical Engineering, V62 Diploma in Mechanical Engineering,V63 Diploma in Electronics and Telecummination Engineering या तीन्ही शिक्षणक्रमांचे सिलँबस पुर्नरचना करण्यास मंजूरी देण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.14 | Prospective Academic Planning (सहपत्र एम)<br>1. Planning regarding academic programmes<br>2. Planning regarding teaching, learning, evaluation<br>3. Use of Technology<br>4. Research and Consultancy<br>5. Student Support Services<br>6. Extension and Linkages<br>7. Financial Management<br>8. Goverences<br>श्री.लक्ष्मीकांत देशमुख, विद्वत परिषद सदस्य यांनी सादर केलेल्या विषयासंदर्भात चर्चा<br>1. REPLACING TEXT BOOKS BY E-BOOKS<br>I understand that University spends around Rs. 30 crores on printing of books for its more than 3000 courses. and it also involve timely work of transportation and distribution throughout the state. With the high penetration of mobile density -specially smart phones it can be made available online in form of e-books. we fortunately have IT experts like Mr. Dipak Shikarpur and media stalwart like Mr. Prataprao Pawar as AC members to guide us. we can chalk out such revolutionary plan and can be realized in 2/3 years. University's IT wing is also quite competent. for this new step I will elaborate it in the meeting<br>2. VIRTUAL CLASS ROOMS AND DISTRICT WISE COMMUNITY RADIOS<br>Each district has 10% funds out of DPDC funds for innovative works. E-learning and virtual class room of each center of university is entitled to get funds for above noted subjects. GOI can sanction community radio for each districts at least for 8 regional centers. if VC can approach planning department of GOM., it is possible to start virtual classrooms and community radios in next 2 years.<br>3. NEW COURSES FROM NEXT ACADEMIC YEARS<br>Based on my experiments in the field and knowledge I suggest following new courses for consideration of Academic Council.<br><br>1) CERTIFICATE COURSE FOR ANGANWADI TEACHERS FOR IMPARTING INFORMAL PRE-SCHOOL EDUCATION:<br>As per national framework of ICDS pre-schooling of children b/n age group of 3 to 6 is important , hence training courses for Anganwadi teachers will become critical in coming days. hence i propose to introduce certificate course for anganwadi teachers of course with the help and consent of Women and Child ministry. The state of Maharashtra is having more than one lakh anganwadies, hence it open great opportunities for the university.<br><br>2) CERTIFICATE COURSE IN WATER CONSERVATION FOR ELECTED |

REPRESENTATIVES OF LOCAL BODIES:

Maharashtra is facing acute water scarcity of water for drinking purpose as well as for farming. the state has an ambitious plan to eliminate famine through Jal Yukt Shivar Abhiyan. If our university design a short duration certificate course for elected members of local bodies with the help of irrigation and agricultural department it will help the state to tackle the poverty and famine. plus it will open great avenues for our university. Daily SAKAL has launched a massive awareness campaign . The paper can cooperate for this course as partner institution.

3) OPENING OF SKILL DEVELOPMENT CETNTRE AT ALL REGIONAL CENTERS:

GOI has launched an ambitious program of skill development mission for Indian youth. Our university can play an important role for realization of this goal . I there fore propose to set up skill development centers at all regional centers of university at maximum ITI centers to offer variety of courses to youth to make them employable.

4) CERTIFICATE COURSE IN E-GOVERNANCE FOR GOVT. EMPLOYEES:

After launching of Digital India program and emphasis on paperless governance and effective delivery of services through service guarantee act, it now become clear that all government employees should be taught E-GOVERNANCE course because MS-CIT is not sufficient now days. with the help of GOM-IT DEPARTMENT , university can start certificate course in E-GOVERNANCE at all taluka places for government employees and officers.

5) ONLINE COURSES FOR MARATHI NRI'S IN MAHARASHTRA CULTURE :

Large number of Maharashtrians are settled in foreign countries still attached to Marathi culture and want that their children born in foreign countries should know basic Marathi culture, language and Maharashtra state in general. our university can state online certificate course in Marathi culture for these NRI maharashtrians.

6) COURSES IN CULTURE LIKE FILM/TV LIKE SCREENPLAY WRITING, EDITING AND FILM MAKING,STAGE CRAFT AND PRODUCTION OF PLAY AND CINEMA, NUTRITION, SOFT SKILLS, MUSIC AND DANCES. (सहपत्र नाही)

८) **वि.प.ठराव: 1. Prospective Academic Planning या विषयासंदर्भात मा. कुलगुरु यांनी खालील बाबींचे सादरीकरण केले.**

**सन 2013-14 या वर्षातील विद्यार्थी नोंदणी, विद्यापीठातील विद्याशाखानिहाय प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनी यांची टक्केवारी, विद्यापीठातील आठ विद्याशाखा व विभागानुसार सुरु असणारे शिक्षणक्रम (प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी, संशोधन), शैक्षणिक नियोजन, नवीन विद्याशाखा/केंद्र सुरु करणेबाबत, संमंत्रण करण्यासाठी नवीन पध्दती व तंत्रज्ञान, औद्योगिक विकास क्षेत्रात विद्यापीठातील विभागीय केंद्राने सुरु करावयाचे शिक्षणक्रम, शैक्षणिक, प्रशासकीय व परीक्षा पध्दतीत सुधारणा, विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात येणाऱ्या योजना इ.बाबी सादर केल्या.**

**2. यापुढे Programme Advisiory Committee च्या निर्देशानुसार अभ्यासक्रम तयार करणे, नाविन्य उपक्रम विकासासाठी मान्यता, नवीन शिक्षणक्रम / अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता, शिक्षणक्रम /अभ्यासक्रमाच्या पुर्नरचनेसाठी मान्यता यासंबंधी विद्यापीठाने तयार केलेल्या नमुन्यास मंजूरी देण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| | | **3. श्री.लक्ष्मीकांत देशमुख यांनी सादर केलेल्या १ ते ६ मुद्यांबाबत त्या त्या विद्याशाखेंतर्गत विद्याशाखा परिषदेवर सदरील विषय ठेऊन त्याची चर्चा करावी. असे ठरले.**<br>**4. विद्वत परिषद सदस्य यांनी विद्यापीठाने विविध विद्याशाखेंतर्गत पुढील शिक्षणक्रम सुरु करावेत असे सुचविले.**<br>**4.1. श्री. प्रतापराव पवार – व्यक्तीमत्व विकास व जीवन कौशल्यावर आधारित शिक्षणक्रम. प्लंबर, मेसन, उद्योग क्षेत्रासंबंधी- एनर्जी ऑडीट, फिशरी रिलेटेड कोर्से, सेरी कल्चर, अल्पसंख्याक, अपंग व अंधासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षणक्रम, गुंतवणूक सल्लागार**<br>**4.2 श्री. प्रभाकर करंदीकर – टीचर्स ट्रेनिंग शिक्षणक्रम, आयबीटी टीचर,स्पॅनिश भाषा, अरेबिक भाषा**<br>**4.3 डॉ.दीपक शिकारपूर - हेल्थ क्लब, फिटनेस मॅनेजमेंट, ब्युटीपार्लर मॅनेजमेंट - व्हीएलसीसी च्या माध्यमाने. संगणक आय.टी क्षेत्रातील शिक्षणक्रम,**<br>**4.4 श्री.लक्ष्मीकांत देशमुख – मसाज, एम.ए समाजशास्त्र,**<br>**5. विद्यापीठाने सन 2015-16 या वर्षात खालील विभागीय केंद्रांतर्गत औद्योगिक दृष्ट्या विकसित विभागामध्ये विद्यार्थी संख्या वाढी संदर्भात प्राधान्याने विचार करण्याचे ठरविले आहे. (१) पुणे – आय.टी व ऑटोमोबाईल, हेल्थ केअर (२) मुंबई – केमिकल, फार्मासुटिकल, आणि रिअल इस्टेट (३) कोल्हापूर – इंजिनिअरिंग, व्होकेशनल, कृषी प्रक्रिया, टेक्सटाईल, आणि पोलाद प्रक्रिया (४) नाशिक – पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी, ईलेक्ट्रॉनिक्स, फार्मासुटिकल, आणि ऑटोमोबाईल, (५) नागपूर व अमरावती – टेक्सटाईल, फळेप्रक्रिया, (६) औरंगाबाद- ऑटोमोबाईल, फार्मासुटिकल**<br>**6. बी.ए टेक्सटाईल या शिक्षणक्रमाचे नाव बदलून B.Voc इन टेक्सटाईल असे करावे तसेच फायर अँन्ड सेफ्टी या शिक्षणक्रमाचे नाव बदलून B.Voc इन फायर अँन्ड सेफ्टी असे करावे. असे सुचविले. व सदरील दोन्ही शिक्षणक्रम निरंतर शिक्षण विद्याशाखेकडे वर्ग करावेत असे ठरले. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** |
| | 51.4.15 | संचालक विद्याशाखा / विभाग – सादरीकरण - शैक्षणिक नियोजनाबाबत (सहपत्र नाही)<br>**वि.प.ठराव: मागील बैठकीत विद्याशाखा/विभाग संचालकांनी सादर केलेले शैक्षणिक नियोजन यापुढे चालू आहे असे सांगितले.** |
| 51.5.0 | | मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय<br>**वि.प.ठराव: निरंक** |

s/d
**सदस्य सचिव**
**विद्वत परिषद**

s/d
**अध्यक्ष**
**विद्वत परिषद**